# बी.ए. (इतिहास)

## द्वितीय वर्ष : सत्र ३

## गृहपाठ : २०१६-१७

### प्राचीन भारताचा इतिहास (मौर्यपूर्व काळ) (HC-301)

**(सत्र ३ : अभ्यासासाठी प्रकरणे : प्रकरण क्र. *१ ते* ५)**

**टीप : नमुना उत्तरात दिलेली प्रस्तावना व समारोप हे उदाहरणादाखल आहेत. त्या व्यतिरिक्त प्रश्नाशी सुसंगत अशी प्रस्तावना व समारोप स्वतंत्रपणे लिहिल्यास त्याचे स्वागतच आहे.**

**१. इतिहासाचे स्वरूप स्पष्ट करा.** **गुण : १५**

**प्रस्तावना** : प्रकरणाच्या प्रास्ताविकामधील इतिहासाची व्याख्या द्यावी.

**इतिहासाचे स्वरूप** – इतिहास एक शास्त्र, इतिहास एक कलाकृती, इतिहासाची व्यक्तिनिष्ठता व गटनिष्ठता, इतिहासाची परिवर्तनशीलता व कालसापेक्षता, लिखित इतिहास हा वर्तमानकाळ व भूतकाळ यांच्यातील कधीही न संपणारा संवाद, इतिहासाची व्यापकता, इतिहासाची समन्वितता

**समारोप** : ४ ते ५ वाक्यात इतिहासाचे महत्त्व लिहावे.

**२. इ.स.पूर्व सहाव्या शतकातील धार्मिक परिवर्तनाची माहिती द्या.** **गुण : १५**

**प्रस्तावना** – इ.स.पूर्व सहावे शतक हे अनेक अर्थाने परिवर्तनाचे शतक ठरले. या शतकात लोह तंत्रज्ञानाचा उदय झाला. शेतीचा व व्यापाराचा विकास झाला. शहरीकरणाला चालना मिळाली. या बरोबरीनेच धार्मिक क्षेत्रातही बदल घडून आले.

**इ.स.पूर्व सहाव्या शतकातील धार्मिक परिवर्तन** – धार्मिक परिवर्तनाची पार्श्वभूमी : यज्ञमार्गाच्या व ज्ञानमार्गाच्या मर्यादा, भाौतिक बदल व त्यातून निर्माण झालेल्या समस्या, संन्यस्तवृत्तीला चालना, श्रमण परंपरा, जैन धर्माचा उदय व आचारविचार, बौद्ध धर्माचा उदय व आचारविचार

**समारोप**– जैन व बौद्ध धर्माचा प्रसार का व कसा झाला ते ४ ते ५ वाक्यात लिहावे.

**३. थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतीही दोन)** **गुण : १५**

**अ) इतिहासाच्या लिखित साधनांची माहिती द्या.**

**प्रस्तावना** – इतिहासाची संदर्भसाधने म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यात लिहा.

**इतिहासाची लिखित साधने** – लिखित साधनांचे महत्त्व, लिखित साधनांची सुरूवात, लिखित साधनांचे प्रकार

**समारोप** – लिखित साधनांचे परीक्षण २ ते ३ वाक्यात लिहावे.

**आ) हडप्पा / सिंधू संस्कृतीतील सामाजिक जीवनाचे वर्णन करा.**

**प्रस्तावना** : हडप्पा संस्कृतीचा शोध कसा लागला ते २ ते ३ वाक्यात लिहा.

**हडप्पा / सिंधू संस्कृतीतील सामाजिक जीवन** – समाजरचना, आहार, वेशभूषा व केशभूषा, अलंकार, खेळ व मनोरंजनाची साधने, लिपी

**समारोप** : हडप्पा / सिंधू संस्कृतीचा ऱ्हास का घडून आला असावा याबाबतची मते २ ते ३ वाक्यात लिहा.

**इ) आर्यांच्या आश्रमव्यवस्थेचे वर्णन करा.**

**प्रस्तावना** – आश्रमव्यवस्था म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यात लिहा.

**आश्रमव्यवस्था** – ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम

**समारोप** – आज अशी व्यवस्था असावी असे तुम्हाला वाटते का? तुमचे मत २ ते ३ वाक्यात लिहा.

**ई) पर्शियन व ग्रीक आक्रमणांची माहिती द्या.**

**प्रस्तावना** : भारतावर पर्शियन व ग्रीक लोकांनी केलेले आक्रमण हा भारतीय लोकांच्या दृष्टीने एक अनोखा अनुभव होता. हा काळ भारतातील साम्राज्यवादाच्या उदयाचा कालखंड होता.

**पर्शियन व ग्रीक आक्रमणे** : ग्रीक व पर्शियन लोक कोणत्या भागातून आले? भारताच्या कोणत्या भागावर त्यांनी आक्रमणे केली, प्रमुख संघर्ष, ग्रीक आक्रमणांचे परिणाम

**समारोप** : ग्रीकांच्या पराभवाबाबत २ ते ३ वाक्ये लिहा.

४. टिपा लिहा. (कोणत्याही दोन) गुण : १५

**अ) प्राचीन भारताच्या इतिहासाची भौतिक साधने**

**प्रस्तावना** : इतिहासाची भौतिक साधने म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यात लिहावे.

**प्राचीन भारताच्या इतिहासाची भौतिक साधने** : प्राचीन अवशेष व स्मारके, नाणी, आलेख, ताम्रपट, शिलालेख

**समारोप** : भौतिक साधनांचे महत्त्व २ ते ३ वाक्यात लिहा.

**आ) हडप्पा / सिंधू संस्कृतीतील नगररचना**

**प्रस्तावना** : नगरे म्हणजे काय व त्यांचे महत्त्व २ ते ३ वाक्यात लिहावे.

**हडप्पा / सिंधू संस्कृतीतील नगररचना** – भव्य तटबंदी, रस्त्यांचे नियोजन, दिवाबत्ती, गृहरचना, बंदिस्त गटारे, महास्नानगृह, धान्याची कोठारे

**समारोप** : हडप्पा / सिंधू संस्कृतीतील नगररचना हे हडप्पा / सिंधू संस्कृती प्रगत असल्याचे लक्षण होते.

**इ) वर्णव्यवस्था**

**प्रस्तावना** : वर्णव्यवस्था म्हणजे काय ते २ ते ३ वाक्यात लिहावे.

**वर्णव्यवस्था** : सुरुवातीची व्यवस्था, वर्णनिश्चितीचे निकष, चार वर्ण व त्यांचे स्थान, कार्ये व अधिकार, बंधने, वर्णव्यवस्थेचे बदलते स्वरूप, जाति-उपजातींची निर्मिती, विषमता, अस्पृश्यता

**समारोप** : जाती आणि आजचा काळ याबाबतचे आपले मत २ ते ३ वाक्यात लिहावे.

**ई) इ.स.पूर्व सहाव्या शतकातील शेतीचा विकास**

**प्रस्तावना** : आर्यांचा मूळ व्यवसाय यावर २ ते ३ वाक्ये लिहावीत.

**इ.स.पूर्व सहाव्या शतकातील शेतीचा विकास** – शेतीवरील भर, जमिनीची मालकी, लोखंडी फाळचा वापर व शेतीचा विकास, खते, जलसिंचन, नैसर्गिक आपत्ती व उपाय, शेती उत्पादने, महसूल पध्दती व प्रशासन इ.

**समारोप** : प्राचीन काळातील शेतीच्या तुलनेत आजच्या काळातील शेतीची २ ते ३ वाक्यात माहिती लिहा.

**५. विद्यार्थीमित्रांनो, या प्रश्नामधील उपप्रश्नांची उत्तरे तुम्हाला पुस्तकात तयार मिळणार नाहीत. क्रेडिट सिस्टिममध्ये यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार विद्यार्थ्यांनी त्यांची निरीक्षणशक्ती, आकलनक्षमता व विचारशक्ती यांचा वापर करून काही काम करणे अपेक्षित आहे. खालील प्रश्न तुम्हाला मनोरंजक व ख-या अर्थाने विचार व अभ्यास करायला प्रेरणा देणारे असतील. एकूण गुण २०**

**अ) इ.स.पूर्व सहाव्या शतकामध्ये भारतात लोह तंत्रज्ञानाचा शोध लागला.** हा शोध किती महत्त्वाचा होता आणि आहे हे कळण्यासाठी तुमच्या आसपास लोखंडाच्या किती वस्तु आहेत याचे निरीक्षण करा आणि लोखंडाच्या अशा १० वस्तुंची यादी तयार करा. गुण ५

**आ) आजच्या काळातील जातींचा प्रभाव यावर निबंध लिहा.** गुण १०